# जनसंपर्क अधिकारी

**मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१

mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २७०-२२ दिनांक ०३/०९/२०२२

## अल्पवयीन मुलीची हत्या करुन पसार झालेल्या अज्ञात आरोपीतांना निष्पन्न व अटक करण्यात वालीव पोलीसांना यश

वालीव पोलीस ठाण्याचे कार्यकक्षेत दिनांक २६/०८/२०२२ रोजी दुपारी १३.३० वा.चे पुर्वी कोणीतरी अज्ञात आरोपीने मयत अनोळखी मुलगी वय. अंदाजे १५ ते १७ वर्षे हिस अज्ञात कारणावरुन कोणत्यातरी धारदार हत्याराने पोटावर वार करुन व इतर हत्याराने मारहाण करुन गंभिर स्वरुपाच्या दुखापती करुन जिवे ठार मारले व पुरावा नष्ट करण्यासाठी तिचे प्रेत काळया व खाकी रंगाचे बॅगमध्ये भरुन नायगाव स्टेशन ते परेरानगर रोडवर, नायगाव पुर्व पश्चिम ब्रीजचे उत्तरेस सुमारे २०० मीटर अंतरावर, रोडचे कडेला झाडी झुडूपामध्ये फेकून दिल्याबाबत गुन्हा नोंद क्र. I ८५८/२०२२ भा.द.वि.सं कलम ३०२,२०१ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गंभीर स्वरुपाच्या गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी व वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर घटनास्थळास भेट दिली. घटनास्थळावर अल्पवयीन मुलीच्या संदर्भाने मिळालेल्या पुराव्याच्या आधारे मुलीच्या पत्त्याचा शोध लागला, सदर मुलीचे अपहरणाबाबत अंधेरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली. सदर अल्पवयीन मुलीच्या घरी अधिक चौकशी केली असता मुलीचा संतोष मकवाना नावाचा मित्र असल्याची व सदर अल्पवयीन मुलगी ही त्यांच्यासोबत गेली असल्याचा संशय मुलीचे घरच्यांनी व्यक्त केला होता.संशयीत संतोष मकवाना याच्या राहत्या घरी जावुन त्याचा शोध घेतला असता तो दोन दिवसापासुन घरी नसून त्याचीही मिसींग तक्रार नोंद होती. तेव्हा तांत्रीक पुराव्यांच्या आधारे आरोपी निष्पन्न झाले. सदर आरोपीतांना पकडण्याकामी पालनपुर येथील स्थानिक पोलीसांच्या मदतीने दिनांक ०३/०९/२०२२ रोजी ताब्यात घेवुन गुन्हयातील आरोपीत नामे १.संतोष मगन मकवाना रा.खार मुंबई २.विशाल दिपक अनभवणे रा.जुहु मुंबई,यांना गुजरात येथुन यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयातील अज्ञात आरोपी निष्पन्न करुन यांना अटकेबाबतची कारवाई श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहायक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/मोहन परकाळे, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर,राजेंद्र फड, पोना /सतिश गांगुर्डे, पो.अंम.श्रीकांत पाटील, गजानन गरीबे, सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी, यांनी पार पाडली आहे.